ISSN NO. 2231-4342

स्थापना १९९१

# संशोधन पत्रिका २०१६

# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

## रौप्य महोत्सवी राष्ट्रीय अधिवेशन

दि. २० व २१ जानेवारी २०१७

– प्रकाशक –

पार्थ विद्या प्रसारक मंडळ
स्थापना १९६५

नॅक पुनर्मुल्यांकित 'A' ग्रेड

ISO 9001-2008 प्रमाणित

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे,

## बाबुजी आव्हाड महाविद्यालय

पाथर्डी, जि. अहमदनगर ४१४ १०२.

फोन : कार्यालय : ०२४२८ – २२२३४९, फॅक्स : २२२३४९

Website: www.babujiavhadcollege.org
E-mail : babujiavhadcollege@gmail.com




Scanned by CamScanner

# संशोधन पत्रिका - २०१६

ISSN No. २२३१ - ४३४२

## अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संस्था नोंदणी क्र. १९९१ / GBBSD / ४२६

- प्रमुख संपादक -

**डॉ. सदाशिव शिवदे**

**अध्यक्ष**

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

- संपादक मंडळ -

प्रा. डॉ. ग.का. माने

प्राचार्य. डॉ. टी.एस. पाटील

प्रा. जे.डी. गोपाल

प्रा. डॉ. प्रशांत देशमुख

प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे

प्रा.डॉ. उत्तम सावंत

प्रा. डॉ. सौ. विजया साखरे

प्रा.डॉ. अशोक कानडे

- प्रकाशक -

**प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे**

बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी, जि.अहमदनगर.



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका
## आधुनिक विभाग - शोध निबंध


| | | | |
|---|---|---|---|
| | समकालिन इतिहासाचे लेखन (अध्यक्षीय भाषण) | डॉ. अवनीश पाटील | २१९ |
| १ | Hon. Jagnath Shankar Sheth (१८०३-१८६५) An Archited of Modern India | Dr. Abhida Dhumatkar | २३४ |
| २ | ज्ञानोदय वृत्तपत्रातील दुष्काळ व शेती संबंधीचे विचार - ऐतिहासिक अभ्यास | प्रा. बाळासाहेब गोरख काळे | २४४ |
| ३ | खादी ग्रामोदयोग क्रांती व बाळासाहेब भारदे | प्रा.के.जे. चव्हाण | २५३ |
| ४ | Reading of Epitaphs of Christ Graveyard of Buldhana. | Dr. Prashant S. Deshmukh | २६० |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर सोहळा | कु. शितल उत्तम सावंत | २६७ |
| ६ | कामगार चळवळीत पार्वतीबाई भोर यांचे योगदान | डॉ. अरुणा अर्जुन मोरे | २७२ |
| ७ | मुंबईतील न्याय व्यवस्थेतील सुधारणांचे आद्य जनक ना. जगन्नाथ शंकरशेठ | डॉ. श्रीनिवास वेदक | २८३ |
| ८ | आधुनिक भारतातील शेतकरी चळवळ | प्रा. जी.डी. रुपवते | २९५ |
| ९ | विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा इतिहास विषयचीचा दृष्टीकोन | रमिला दिपक गायकवाड | ३०१ |
| १० | गोवा मुक्ति आंदोलन आणि राममनोहर लिहिया. | प्रा. दिपक बाबुलाल धोबी | ३०९ |
| ११ | अहिंसात्मक सत्याग्रहाचे महाराष्ट्रातील क्रांतीकारी स्वरुप | प्राचार्य डॉ. विजय पांडुरंग कुलकर्णी | ३१६ |
| १२ | हैदराबाद संस्थानातील निजाम विरोधी लढा आणि उस्मानाबाद - लातूर जिल्हयातील महाराष्ट्र परीषदेचे अधिवेशने. | डॉ. शिवराज बोकडे | ३२२ |
| १३ | अंबादेवी मंदिरप्रवेश आंदोलन आणि डॉ. पंजाबराव देशमुख. | प्रा. अनंत दादाराव मरकाळे | ३३२ |
| १४ | महाराष्ट्र एकीकरण समिती व बाळासाहेब पाटील एकंबेफर. | डॉ. एस.डी. सावंत | ३४० |
| १५ | डॉ. भाऊ दाजी लाड यांचे अर्थकारण | डॉ. उत्तम आप्पासाहेब पठारे | ३४९ |




Scanned by CamScanner

# गोवा मुक्ति आंदोलन आणि राममनोहर लोहिया.

संशोधक विद्यार्थी
दीपक बाबूलाल धोबी,
मु.पो. गोंदेगाव ता. जामनेर जि. जळगाव.
मो.नं. ९७६७३६९६३७

**प्रस्तावना :—**

गोवा हा भारताचा अविभाज्य भाग होता. इ.स. १४९८ मध्ये वास्को—दी—गामा हा पोर्तुगीज खलाशी राजा दो. मान्युएल पहिला याच्या आज्ञेने कालिकत (केरळ) बंदरावर पोहचला. तेथे त्याने वसाहत स्थापन केली.[१] साम्राज्यवादी दृष्टीकोनातून पोर्तुगीजांनी संपूर्ण गोव्यावर आपली सत्ता दृढ केली. पोर्तुगीजांनी भारतावर ४५० वर्षे राज्य केले.[२] या काळात मुघल,डच,इंग्रज, व मराठे यांच्याशी पोर्तुगिजांचा संबंध आला. भारतात पोर्तुगीज व्हाईसरॉय कारभार पाहत असे. इ.स. १९३३ मध्ये भारतावर पोप व शासनाशी झालेल्या कारभारानुसार ख्रिश्तीमिशनरी, गोव्यात आले. त्यांनी गोमंतकीयांना पोर्तुगीजनिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला. २५ नोव्हे. १९४७ मध्ये सालाझारांने गोमंतक हा पोर्तुगीजांचाच एक भाग असल्याचे जाहीर केले. गोमंतकीयांनी पोर्तुगीजांचे पारतंत्र झुगारून देण्यासाठी राजकीय मार्गाने प्रयत्न सुरु केले. भारतीय पुढा—यांनी गोमंतकातील राजकीय जागृतीला चालना दिली. इ. स. १९३० मध्ये गोवा काँग्रेस कमेटी, गोवा लीग, यांच्यासारख्या संस्था अस्तित्वात येवून त्यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी सबंध आला. जून १९४६ मध्ये राममनोहर लोहिया यांनी गोमंतकात प्रवेश करून कायादेभागांची चळवळ सुरू केली.

उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील अकबरपुर येथे सामान्य मध्ययुगीन कुटुंबात राममनोहर लोहिया यांचा जन्म २३ मार्च १९१० रोजी झाला. राजकारणाची गोडी लोहिया यांना १९२६ च्या गोहातीच्या घटनेपासून लागला. १९२६ च्या गोहातीकाँग्रेसचे स्वयंसेवक म्हणून हजर राहिले होते. १९३४ मध्ये काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्षाची स्थापना त्यांनी केली. त्यांनी स्वता:ला पूर्णपणे राजकारणात झोकून दिले होते. काँग्रेस सोशलीस्ट नियाताकाच्या संपादकाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली होती. लखनौ अधिवेशनात जवाहरलाल नेहरू यांनी त्यांची नेमणूक राष्ट्रसभेच्या परराष्ट्र विभागाचे सचिव म्हणून केली होती.[३] ते



Scanned by CamScanner

त्या पदावर मे १९३८ पर्यंत होते. लोहिया यांचे घराणे व्यापारी त्यांच्या अनेक पिढ्या लोखंडाचा व्यापार करीत होते. वडील काँग्रेसकार्यकर्ते होते. १९२५ मध्ये ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले होते. १९२९ मध्ये बी. ए. (ऑनर्स) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी जर्मन येथील हम्बोल्ड विद्यापीठात १२२९ मध्ये अर्थशास्त्राच्या डॉक्टरेट पदवी अभ्यासाकरिता प्रवेश घेतला होता. तसेच परदेशी असतांना त्यांनी जिनेव्हा येथे लिग ऑफ नेशन्स अधिवेशनात ब्रिटीश विरोधी निषेध प्रदर्शन केले. जर्मनीत असतानांच त्यांनी आजीवन राजकीय कार्याचा निर्णय घेतला.

दूसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्यांनी प्रखर युद्धविरोधी भूमिका स्वीकारली. साम्राज्यशाही विरोधी, युद्धविरोधी भाषणे केल्याबद्दल ब्रिटीश सरकारने त्यांना अटक केली.[४] तेव्हापासून राममनोहर लोहियांच्या आयुष्यात जे अटकसूत्र सुरु झाले. ते अखेर पर्यंत सुरुच राहिले. स्पष्ट व कणखरपणा, आक्रमक कर्तृत्व आणि प्रचंड प्रतिसाद या कारणांमुळे स्वातंर्त्यपूर्व काळात नव्हे तर स्वातंर्त्योत्तर काळातही लोहिया यांना कारावास भोगावा लागला.[५] स्वातंत्र्याच्या पाश्चिमात्य परंपरा पचवून त्यांनी भारताच्या प्राचीन परंपरांशी मेळ घालण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी जन्मभर पार पाडले. मार्क्सवादाचे त्यांना आकर्षण होते. पण त्यांच्या विचारांचा पाया गांधीवादाचा होता. त्यांच्या समाजवादात या तिनही विचारसरणीचा समन्वय होतो.[६]

गोवा मुक्ति आंदोलनाला १९४५—१९६१ या कालखंडात पोर्तुगीजांनी आळा घातला. यातूनच गोव्यात आंदोलन घडले. भारतीय स्वातंत्र लढ्याला समांतर गोव्यात आंदोलन घडले. या आंदोलनात व्यक्ती , संस्था , संघटना व विचार सक्रीय होते. या आंदोलनात भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील नेत्यांनी महत्वाचे कार्य केले. राममनोहर लोहिया यांनी या आंदोलनात प्रेरित केले. कारण डॉ. लोहिया व गोमंतकातील मिनेझिस जर्मनीतीत दोघ मित्र रिकामे असतांना त्यांनी लोहिया यांना गोव्यातील पोर्तुगीजांच्या अत्याचाराची,अन्यायाची कथा सांगितली होती. तेव्हाच त्यांच्या विरुद्ध लढले पाहिजे असे लोहिया म्हणाले होते.[७] जर्मनीतील विचारांचा पाठपुरावा लोहिया यांनी १९४६ मध्ये केला. १८ जून १९४६ रोजी राममनोहर लोहिया यांनी गोमंतकात प्रवेश करून कायदेभंगाची चळवळ सुरु केली.[८] भारतीय स्वतंत्र चळवळीबद्दल गोव्यातील कार्यकर्त्यांना आकर्षण वाटत होते. पोर्तुगीजांच्या पाशवी जुलुमामुळे गोव्यातील राजकीय आकांशा दडपून गेली होती.[९] म.गांधीनी सत्याग्रह आंदोलन सुरु केले. त्यावेळी गोव्याचे



रहिवासी व श्रेष्ठ भारतीय विद्वान डॉ. धर्मानंद कोसंबी हे सत्याग्रह आंदोलनात सहभागी झाले होते. त्यांनी त्यासाठी कारावासही भोगला होता. गोव्यातील अन्य काही कार्यकर्त्यांनी भारताच्या स्वतंत्र लढ्यात व्यक्तीश: भाग घेतला परंतु गोव्यामध्ये राजकीय चळवळ उभी राहू शकली नाही. स्वतंत्र लढ्यात सक्रीय भाग घेतलेल्या लोहियांनी स्वातंत्र्यांत्तर काळातही आपला निष्ठांशी इमान राखून विविध आघाड्यंवरील संघर्षात झोकून दिले. गोवा हा भारतातच एक भाग होता. शेतकऱ्यांचे लढे, जामिन तोडा आंदोलन, अंग्रेजी हटाव आंदोलन,हिंदी राष्ट्रभाषा व्हावी म्हणून संघर्ष, नेपाळचा स्वातंत्रलढा या सारख्या संघर्षात लोहिया यांनी भाग घेतला होता. यापैकी गोवामुक्ति आंदोलनात देखील लोहियांचे कार्य अतिशय उल्लेखनीय आहे.

जर्मनीत शिक्षणासाठी असताना डॉ. मिनेझिस या आपल्या गोमंतकमित्रांच्या निमंत्रणावरून लोहिया केवळ विश्रांतीसाठी जुन १९४६ च्या प्रारंभी गोव्यात गेले होते.[११] राममोहन लोहीया यांची गोव्यात येण्याची वार्ता समजल्यावर गोव्यातील कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले लोहिया म्हणजे भारतातील राजकारणाचे चौतन्य होते.[१२] त्यामुळे त्यांच्या आगमनाने मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांच्या मनात उत्साह निर्माण झाला. छोडो भारत क्रांतीचा एक अग्रगण्य नेता आपल्या भूमीत आल्याची बातमी समजताच अनेक स्वातंत्रवादी विद्यार्थी, तरुण, अध्यापक, व्यापारी, इतर समाजातील नागरीक, ऐवढेच नव्हे तर. सरकारी नोकर व पोलीसही लोहीया यांना भेटले.[१३] जेथे हुकुमशाही असे तेथे लोहिया उभे राहून निर्भयपणे हुकुमशाहीच्या ढोंगाचा आणि असत्याचा ते निषेध करीत.[१४] याचेच एक उदाहरण म्हणजे बर्लिन मध्ये शिकत असतांना राष्ट्रसंघाची बर्लिन येथे परिषद झाली होती.[१५] १९३० चा तो काळ होता, भारतामध्ये सत्याग्रह सुरु झाला होता. महात्मा गांधींच्या नेतृत्वा खाली असंख्य तरुण तुरुंगवास भोगत होते. देशातील ही परिस्थिती सांगण्याएवजी राष्ट्रसंघामध्ये बिकानेरचे महाराज ब्रिटीशांचे हाजीहाजी करत होते.[१६] लोहिया यांना हे ढोंग आवडले नाही. डॉ. लोहिया व त्यांचे मित्र ज्युलियन मिनेझिस यांनी राष्ट्रसंघाच्या प्रेषक दालनातून शिटी वाजविली.[१७] त्यांना प्रेक्षक गृहातून बाहेर काढण्यात आले.लोहिया एवढ्यवरही थांबले नाही. राष्ट्रसंघाच्या अध्यक्षांना त्यांनी जाहीर निवेदन दिले व हिदुस्थानातील परिस्थिती सांगितली. वृत्तपत्रांनी लोहिया यांचे निवेदन प्रसारित केले.[१८] लोहिया यांनी त्या निवेदनाच्या

प्रती राष्ट्रसंघाच्या सर्व सभासदांना दिल्या. या काळी त्यांच्याबरोबर गोव्यातील ओसोळणे येथील तरुन मित्र ज्युलियान मिनेझिस होते.[१९]

या सर्व पार्श्वभूमीचा विचार केल्यास लोहिया यांचे गोव्यातील आगमन महत्वाचे होते कारण गोव्यातील कार्यकर्त्यांना एका प्रेरक व्यक्तीच्या विचारांची व प्रेरणेची आवश्यकता होती. ती लोहिया याच्या गोव्यात आगमनाने तरुण कार्यकर्त्यांना मिळाली. पोर्तुगीजसत्तेने गोव्यात अनेक प्रकारचे बंधने लादले होते. गोव्यात सभा, मिरवणुका, वृत्तपत्रे, छापखाने, धार्मिक उत्सव, विवाह वगैरे यांसारखी अतिशय जाचक बंधने त्यावेळी अस्तित्वात होती.[२०] म्हणून आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्याठी त्यांच्याविरोधात सत्याग्रह लढा उभारण्याचा निश्चय गोमंतकीय राष्ट्रवादी नेत्यांनी लोहिया यांच्या मार्गदर्शनाखाली केला.

१८ जुन १९४० या दिवशी मडगावला नगरपालीके जवळच्या मैदानात डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोवा सरकारच्या सभा बंदीवर कायदा मोडण्यासाठी प्रचंड सभा घेतली. या घटनेनंतर गोवा मुक्तिची चळवळ सुरु झाली.[२२] या आंदोलनाचा प्रथम प्रारंभ डॉ. लोहिया यांनी केला आता पर्यंत गोव्यात अशा प्रकारच्या तरुणांचा सहभाग कधीही झालेले नव्हता. म्हणून एक मार्गदर्शक हा गोव्यातील तरुणांना मिळणार होता. लोहिया यांनी गोव्यात बैठक घेतली बैठकीत स्वातंत्रलढा उभारण्याऐवजी व मुलभूत नागरिक स्वातंत्र संपादण्याऐवजी मर्यादित आंदोलने करावी यावर एकमत झाले.[२३] भाषण बंदीचा कायदा मोडण्यासाठी मडगाव येथे जाहीर सभा घेण्याचे ठरले.[२४] सभेचे स्थान मडगाव निश्चित करण्यात आले. सभेला पोलिसांचा काटेकोर बंदोबस्त होता. मशीनगन घेऊन पोलीस उभे होते. पाऊस धुवाधार कोसळत होता. तरीही दहा हजार लोक सभेला जमले होते.[२५] गोव्यात ही पहिलीच जाहीर सभा होती. जय हिंद....!! महात्मा गांधी कि जय !! डॉ. लोहिया जिंदाबाद !! या घोषणा सहस्त्र कंठातून निनादत होत्या.[२६] लोहीयाना सत्याग्रह करण्यापूर्वी पकडायचे पोलिसांनी ठरविले होते. मैदानाच्या दिशेने जाण्याच्या सर्व ट्रफिक पोलिसांनी चौकीवर वळविल्या जात होत्या. लोहिया यांना मैदानावर नेण्याचे काम लक्ष्मनदास बोरकर यांच्याकडे सोपविले होते.[२७] म्हणून सभेत लोहिया यांच्या भाषणावर पोर्तुगीज पोलिसांनी बंदी उठविली. व लोहिया यांना कैद केले. या सभेत खूप गर्दी झाली होती आपणाला तुरुंगात जावे लागणार याची कल्पना लोहिया यांना होती."तुम्ही काळजी करू नका"असे लोहिया यांनी लोकांना सांगितले.[२८] लोकांनी गावात मिरवणुका काढल्या पोर्तुगीज



सरकारचा निषेध केला मुंबई च्या वर्तमानपत्रात डॉ. लोहिया यांचे निवेदन प्रकाशित झाले. ते म्हणतात " मी गोव्याला आलो आहे, मी गोव्याला जाणून घेण्यासाठी,गोव्यातील जनता कशी आहे याची माहिती करून घेण्यासाठी. मी तुमच्या संबधी बरेच एकले आहे. आणि तुमच्यापैकी काही जणांना मी मित्र मानतो. राज्यकर्त्यांनी आम्हाला कसे वागविले. आत्मा नसलेल्या संस्कृतीत कसे ढकलले आणि तुमचे नागरी स्वातंत्र हिरावून घेतले. याची मला कल्पना आहे.परंतु तुम्ही लोक कोणाच्या रजवटीखाली नांदत आहात ते पाहिल्यावर मला अतिशय आश्चर्य झाले".[२९] अशा प्रकारचे निवेदन लोहिया यांनी दिले यातूनच तरूणाच्या मनासारखे एक उत्साह निर्माण झाला.

लोहियांनी भाषणात ''भारतातील साम्राज्यवादाचे अखेरचे आश्रय स्थान असलेली पोर्तुगीज सत्ता संपुष्टात आणण्याचे हे पहिले पाउल आहे. असे उद्‌गार काढले.[३०] लोहिया यांनी सर्वसामान्य लोकांच्या व तरुणांच्या मनामध्ये देशभक्तीची ज्योत पेटविली. याचा परिणाम असा झाला की, पुढील काही दिवस गोव्यात सभा, मोर्चे, मिरवणुका निघू लागल्या हजारो लोक त्यात सहभागी झाले.[३१] लोहिया यांनी केलेल्या आपल्या मार्गदर्शनातून पुढील प्रमाणे परिणाम गोव्यातील जनतेचा झाला. त्या चळवळीत गोव्यातील हिंदू–ख्रिस्ती समाज्याच्या तरुणांनी खांद्याला खांदा लाऊन भाग घेतला. राज्यकर्त्यांनी दोन्ही जमातींना शतकानुशतके एकमेकांपासून दूर ठेवले होते. या प्रेरणेमुळे त्यांना तडा गेला, स्त्रिया घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडल्या. लोहिया यांच्या आंदोलनाने त्यांच्यात क्रांती उत्पन्न केली, म्हणुन गोमंतक चळवळ सुरु ठेवण्यासाठी डॉ .लोहिया यांनी पुरुषोत्तम काकोडकरांची नियुक्ती केली होती.[३२] लोहिया यांच्या झालेला कायदेभंगाच्या सभेविषयी महात्मा गांधीजी यांनी हरिजनच्या अंकात लेख लिहला.[३३] ते लिहतात "बंदुकीचा एकही वार काढल्याशिवाय गोव्याच्या लोकांना मुक्त राष्ट्राचे नागरिक स्वतंत्र मिळेलआणि स्वतंत्र भारतात गोव्याचे वेगळे राहू दिले जाणार नाही... ''गांधीजींच्या या वाक्यावरुन गांधीजीच्या विचारांची कोणती दिशा होती. याची कल्पना येते.[३४] नागरी स्वातंर्त्याचे विचार महात्मा गांधीजीनी हरीजन मधून व्यक्त केले.

गोवा आंदोलनात महात्मा गांधीजीचे प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळावे म्हणुन पुरुषोत्तम काकाडेकर व एन्हाग्रीयू जॉर्ज जुलै महिन्यात पाचगणीला जावून महात्मा गांधीजी यांना भेटले. डॉ. लोहिया यांनी चळवळीच्या कार्यक्रमाविषयी तयार केलेला आराखडा त्यांनी बरोबर घेतला होता.[३५]



Scanned by CamScanner

तो गांधीजीनी बघितला व त्यावर चर्चा केली आणि अखेर गोव्याला जावून डॉ. लोहीया यांच्या सल्यानुसार चळवळ पुढे चालवा असा सल्ला दिला.[३६] लोहिया यांनी सुरु केलेला आपल्या चळवळीला गोव्यात खूप मोठया प्रमाणावर पाठिंबा मिळाला ,पण राजकीय पंडितांच्या मते गोवा आंदोलनाकडे कॉंग्रेसचे दुर्लक्ष घेण्याचे आणखी एक कारण होते ते म्हणजेच लोहिया समाजवादी नेत्याने जे आंदोलन प्रारंभ केले होते . लोहिया यांना पाठिबा देवून समाजवादी पक्षाच्या पारड्यत वजन टाकून जळ करण्याची कॉंग्रेसची इच्छा नव्हती.[३७]

एकंदरीत डॉ. लोहिया यांनी गोव्यामध्ये जावून तेथील कार्यकर्त्यांना आपल्या आंदोलनाबद्दल प्रेरित केले. पहिल्यांदा गोव्यात प्रचंड कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत कायदेभंग करण्यात आला. १९५४—५५ मध्ये गोमंतकीय स्वातंर्त्यवाद्यांनी गोवा अंतर्गत सत्याग्रह आंदोलनात आणि संपूर्ण भारतातील लोकांनी गोवा सीमेवर प्रवेश करून केलेली सत्याग्रहाची विशाल चळवळ यांचा पाया १९४६ च्या लोहिया यांच्या सत्याग्रहाने घातला. म्हणुन गोमंतकीय जनतेला प्रेरित करण्याचे काम डॉ. राममनोहर लोहिया यांनी केले.

**संदर्भः**


१. जोशी लक्ष्मन शास्त्री, मराठी विश्वकोश खंड—१०, पृ.क्र.४५.
२. तत्रैव.
३. भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अॅन्ड पब्लिशर्स नागपूर, व्दितीय आवृत्ती २००३ पृ.क्र.६४०
४. तत्रैव.
५. तत्रैव.
६. तत्रैव.
७. केळकर इंदुमती व केळकर श्रीपाद्कृष्ण, राममनोहर लोहिया, एन.बी.टी. बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, चौथी आवृत्ती २०१३, पृ.क्र. ४६.
८. जोशी लक्ष्मण शास्त्री, पूर्वोक्त पृ.क्र. ४६.
९. प्रधान ग.प्र. स्वातंत्र संग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती २००९, पृ.क्र. ४३१.
१०. भोळे भा.ल. पूर्वोक्त पृ.क्र.६४१.
११. केळकर इंदुमती व केळकर श्रीपादकृष्ण, पूर्वोक्त.
१२. भोळे भा.ल. पूर्वोक्त.
१३. केळकर इंदुमती व केळकर श्रीपाद्कृष्ण, पूर्वोक्त.





१४. भोळे भा.ल. पूर्वोक्त.
१५. राधाकृष्ण वामनः गोवा मुक्ती संग्राम, सदाशिव बागाईतकर स्मृती व्याखानमाला पुणे, १९८९, पृ.२८.
१६. तत्रैव.
१७. तत्रैव.
१८. तत्रैव.
१९.तत्रैव.
२०. केळकर इंदुमती व केळकर श्रीपादकृष्ण, पूर्वोक्त पृ.क्र. ४७
२१. तत्रैव.
२२. सातोस्कर बा.द. गोमंतक प्रकृती आणि संस्कृती खंड—३ अर्वाचीन गोव्याचा इतिहास, शुभदा सारस्वत पब्लिकेशन, प्रा. लि. प्रथमावृत्ती १९८९ पृ.क्र. २६९.
२३. तत्रैव.
२४. तत्रैव.
२५. तत्रैव.
२६. तत्रैव.
२७. राधाकृष्ण वामनः पूर्वोक्त पृ.क्र. ३०.
२८. तत्रैव.
२९. तत्रैव.
३०. केळकर इंदुमतीः पूर्वोक्त पृ.क्र.४७.
३१. सातोस्कर बा.द. पूर्वोक्त पृ.क्र.२८४.
३२. तत्रैव.
३३. तत्रैव.
३४. तत्रैव.
३५. तत्रैव.
३६. तत्रैव.
३७. तत्रैव.





Scanned by CamScanner